“सोमनाथ स्वाभिमान पर्व-१००० वर्ष की अखंड आस्था” या यात्रेच्या निमित्त त्र्यंबकेश्वर येथे सांस्कृतिक कार्यक्रमावरील आयोजन खर्चास वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र.२२२(ई. १६९०५५८)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६

वाचा : १.सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./ १६७९, दिनांक २१ मे, २०२६.
२.पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र.२२२ (ई. १६९०५५८)/सां.का.४, दिनांक १० जून, २०२६
३. सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./२५०९, दिनांक ०६ ऑगस्ट, २०२६.

प्रस्तावना :-

भगवान सोमनाथ मंदिर हे भारतीय संस्कृती, श्रद्धा, स्वाभिमान आणि पुनरुत्थानाचे प्रतीक आहे. हजार वर्षांच्या संघर्ष, आक्रमण आणि पुनर्निर्माणाच्या इतिहासातून उभा राहिलेला सोमनाथ हा भारतीय अस्मितेचा दीपस्तंभ आहे. स्वतंत्र भारतात मे १९५१ मध्ये मंदिराच्या पुनर्बांधणीस व पुन: उद्घाटनास ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भारत सरकारतर्फे दि.११ जानेवारी २०२६ ते ११ जानेवारी २०२७ या कालावधीत वर्षभर “सोमनाथ स्वाभिमान पर्व - १००० वर्ष की अखंड आस्था” या राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. संदर्भ क्र. ०२ वरील शासन निर्णयान्वये “सोमनाथ स्वाभिमान पर्व- १००० वर्ष की अखंड आस्था” यात्रेच्या निमित्त त्र्यंबकेश्वर (नाशिक), भीमाशंकर (पुणे) व घृष्णेश्वर (छत्रपती संभाजीनगर) येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व त्यावरील खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. उपरोक्त संदर्भ क्र. ०३ अन्वये त्र्यंबकेश्वर येथे आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमावरील आयोजन खर्चास वित्तीय मान्यता देण्याची विनंती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर सांस्कृतिक कार्यक्रमावरील आयोजन खर्चास वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

“सोमनाथ स्वाभिमान पर्व-१००० वर्ष की अखंड आस्था” या यात्रेच्या निमित्त त्र्यंबकेश्वर येथे सांस्कृतिक कार्यक्रमावरील आयोजन खर्च रुपये २५,००,०००/- (अक्षरीरुपये पंचवीस लक्ष फक्त) इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

०२.	सदर खर्च "मागणी क्र. झेडडी-०२, २२०५, कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती प्रचालन, (०२) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य कला संस्कृति जतन, संवर्धन विविध महोत्सव तसेच इतर कार्यक्रम (कार्यक्रम) (२२०५ १५०७) - ५० इतर खर्च" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यात यावा.

०३.	यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४.	सदर कार्यक्रमासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या विनियोगानंतर संचालकांनी एक महिन्याच्या आत कार्यक्रम खर्चाच्या सविस्तर तपशीलाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

०५.	सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनिमय, दिनांक ११, ऑगस्ट, २०२६, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०६.	सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ५१३/२०२६, व्यय-१५, दिनांक २३ जुलै, २०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०७.	सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ मधील सर्व परिच्छेद परीशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

०८.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८१३१४५०३०१७४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DILIP SOPAN SOLASE

Digitally signed by DILIP SOPAN SOLASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, 2.5.4.20=D88CF2A56EDC338F09BD490729979CB0522F3B3817594F767716F4DFF3A1B161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF039EE19AAD174683FF6B9738A6D180446F4C40E7376611B216C04C9C67E5AF, cn=DILIP SOPAN SOLASE
Date: 2026.08.13 15:03:59 +05'30'

(दिलीप सो. सोळसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई.

५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. निवडनस्ती, सां.का. ४